दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२४ सप्टेंबर २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ४ थे ● अंक १० पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 24 September 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 04 ● Issue 10 Pages 4 ● Rate 4 Rs


## परतीच्या पावसाचा जोर वाढणार

**मुंबई**–गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने आता पुन्हा एकदा परतीच्या प्रवासाला सुरुवात केली आहे. तो अधिक रौद्ररूप धारण करण्याची चिन्हे आहेत. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्यामुळे महाराष्ट्रात परतीच्या पावसाचा जोर वाढणार आहे. हवामान विभागाने आज राज्यातील बहुतांश भागांत जोरदार वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे.विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाचा जोर अधिक राहणार असून, राज्याभरातील तब्बल २९ जिल्ह्यांना हवामान विभागाकडून 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीजवळ एक तीव्र कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. आज त्याचे रूपांतर 'डीप डिप्रेशन'मध्ये (अति तीव्र कमी दाबाचे क्षेत्र) होण्याची दाट शक्यता आहे.

# धार्मिक सण-उत्सवात सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास बंदी

## ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा, मुंबई हायकोर्टाचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

धार्मिक सण, उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदूषणाची मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. ध्वनी प्रदूषणासंदर्भात दाखल झालेल्या सुमोटो जनहित याचिकेवर मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने सार्वजनिक रस्ते आणि ठिकाणी फटाके फोडण्यास बंदी घालण्याचे तोंडी निर्देश दिले. तसेच मिरवणुकांमध्ये आवाज वाढवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सिलिंडरसारख्या उपकरणांवरही बंदीचे निर्देश देण्यात आले.

न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. गणेशोत्सव तसेच अन्य धार्मिक उत्सवांमध्ये निर्धारित वेळ आणि ध्वनी मर्यादांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात संगीत वाजवले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने सोमवारी स्वतःहून ही याचिका दाखल करून घेतली होती. त्यानंतर मंगळवारी सकाळ आणि दुपारच्या सत्रात या प्रकरणावर सविस्तर सुनावणी झाली.

सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होते. त्याचबरोबर फटाक्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषणातही वाढ होते. विशेषतः मुंबईसारख्या शहरांमध्ये सप्टेंबर-ऑक्टोबरदरम्यान हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न गंभीर होतो. या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या वापरामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबत न्यायालयाने चिंता व्यक्त केली.सण-उत्सव साजरे करण्यास न्यायालयाचा विरोध नसला, तरी नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून सार्वजनिक रस्ते आणि ठिकाणी फटाक्यांचा वापर रोखण्याची गरज असल्याचे खंडपीठाने



स्पष्ट केले. यासंदर्भात लवकरच सविस्तर लेखी आदेश जारी केला जाणार असल्याचेही न्यायालयाने सांगितले.

धार्मिक मिरवणुका आणि विसर्जन सोहळ्यांमध्ये लाऊडस्पीकर किंवा ॲम्प्लीफायरचा वापर करताना नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल. लाऊडस्पीकर वापरण्यासाठी संबंधित प्रशासनाची परवानगी घेणे आवश्यक असून, ही परवानगी मिळाल्याचे पत्रक किंवा फलक दर्शनी भागात लावणे आवश्यक करण्यात येणार आहे.परवानगीचे पत्रक नसताना लाऊडस्पीकरचा वापर केल्यास संबंधित उपकरणांवर कारवाई होऊ शकते. ध्वनीची पातळी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास उपकरण जप्त करण्यासह कायद्यानुसार कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.मिरवणुकांमध्ये आवाज अधिक वाढवण्यासाठी सिलिंडरसारख्या उपकरणांचा वापर केला जात असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. अशा उपकरणांमुळे ध्वनी प्रदूषणात वाढ होत असल्याने त्यांच्या वापरावरही पूर्ण बंदी घालण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

ध्वनी प्रदूषण आणि पर्यावरणासंदर्भात आधीपासूनच स्पष्ट कायदे व नियम अस्तित्वात असताना त्यांचे उल्लंघन होत असल्याबाबत न्यायालयाने राज्य सरकारला प्रश्न विचारले. नियम असतानाही नागरिकांकडून ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारी का येत आहेत आणि नियमांची प्रभावी अंमलबजावणी का होत नाही, असा सवाल खंडपीठाने केला.ध्वनी प्रदूषणाचे नियम मोडल्यास दंडाची तरतूद आहे. मात्र, केवळ दंड भरून नियम मोडण्याला अप्रत्यक्ष परवानगी मिळत असल्यासारखी परिस्थिती निर्माण होता कामा नये, अशी भूमिका न्यायालयाने सुनावणीदरम्यान व्यक्त केली.

# खापर परिसरात बिबट्याचा वावर कायम मध्यरात्री कडवामहू फाट्यावर दर्शन

## तुलसी हॉटेलजवळ वन्यप्राणी दिसल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल;नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण;वन विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील खापर परिसरात बिबट्याचा वावर अद्यापही सुरू असल्याचे समोर आले असून, बुधवारी रात्री सुमारे १२ वाजेच्या सुमारास कडवामहू फाटा येथील तुलसी हॉटेलजवळ वन्यप्राणी दिसल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. रात्रीच्या वेळी वर्दळीच्या परिसरात वन्यप्राण्याचे दर्शन झाल्याने परिसरातील नागरिक, वाहनधारक तसेच हॉटेल व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे,यापूर्वीही या परिसरातील बिबट्याच्या वावराबाबत माध्यमांतून वृत्त प्रसिद्ध झाले होते.त्यामुळे वारंवार होणाऱ्या दर्शनामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



सदर प्रकरणाबाबत माध्यमांशी वन परिक्षेत्र अधिकारी पी.बी. पाटील तसेच वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी अमोल लाड यांच्याशी संपर्क साधला असता,केवळ वन्यप्राणी परिसरात दिसला म्हणून त्याला जेरबंद करता येत नसल्याची भूमिका वन विभागाकडून मांडण्यात आली.अशा परिस्थितीत नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करणे शक्य असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले.तसेच वन्यप्राण्याच्या हल्ल्याची घटना किंवा जीवितहानी झाल्याशिवाय त्याला जेरबंद करता येत नसल्याचेही स्पष्ट माहिती देण्यात आली.वन्यजीवांचे संरक्षण हा महत्त्वाचा भाग असला तरी मानवी वस्तीजवळ वारंवार वन्यप्राणी दिसत असल्याने संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान दोन आठवड्यांपूर्वी याच विषयावर माध्यमांतून वृत्त प्रसिद्ध होऊनही पुन्हा त्याच परिसरात मध्यरात्री वन्यप्राणी दिसल्याने वन विभागाच्या प्रत्यक्ष हालचालींबाबत नागरिकांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत. जनजागृतीसोबतच संवेदनशील परिसरात गस्त,वन्यप्राण्याच्या हालचालींचे निरीक्षण आणि परिस्थितीनुसार आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. हल्ला किंवा जीवितहानी झाल्यानंतरच कारवाई होणार का ? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून,संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रशासनाने घटना घडण्याची प्रतीक्षा न करता परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यक पावले उचलावीत अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ग्रामसभेत संधी; २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**दिपक गोसावी । नंदुरबार**

महाराष्ट्र शासन आणि महिला किसान अधिकार मंच (मकाम) यांच्या वतीने महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळवून देण्यासाठी महत्त्वाची मोहीम राबविण्यात येत आहे. आगामी २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत पात्र महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

जमिनीच्या मालकीवर नाव नसले तरी प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिला, भूमिहीन व शेतमजूर महिला, भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या तसेच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधुमक्षीपालन, रेशीम उत्पादन, फळबाग, फुलशेती, मशरूम उत्पादन, गांडूळ खत निर्मिती आणि वनउत्पादनाशी संबंधित काम करणाऱ्या महिलांनाही या उपक्रमाचा लाभ घेता येणार आहे.

यासाठी पात्र महिलांनी ऑनलाइन स्वघोषणापत्राद्वारे अर्ज करावा. ग्रामसभा किंवा नगरपंचायत स्तरावर अर्जांची छाननी करून संबंधित महिला प्रत्यक्ष शेती अथवा शेतीपूरक व्यवसाय करते का, याची पडताळणी केली जाणार आहे. त्यानंतर ग्रामसभेत



ठराव मंजूर करून निर्धारित प्रक्रियेनुसार प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. पात्र महिला अर्ज करण्यापासून वंचित राहिल्यास ग्रामसभेला स्वतःहून पुढाकार घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

महिला शेतकरी म्हणून अधिकृत ओळख मिळाल्यामुळे कृषी विभागाच्या विविध योजना, बियाणे, अवजारे, आर्थिक सहाय्य, कर्ज व इतर शासकीय सुविधांचा लाभ घेण्याचा मार्ग अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे महिलांनी मोठ्या संख्येने अर्ज करून २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत सहभागी व्हावे, असे आवाहन महिला किसान अधिकार मंचच्या वतीने करण्यात आले आहे.

# विधान परिषदेच्या पदवीधर-शिक्षक पाच मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर

दैनिक वादळ वार्ता । **मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम अखेर जाहीर झाला आहे. पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर पदवीधर तसेच अमरावती आणि पुणे शिक्षक अशा पाच मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून २७ ऑक्टोबरला मतमोजणी होणार आहे.

या निवडणुकीत पुणे पदवीधर, नागपूर पदवीधर, छत्रपती संभाजी नगर पदवीधर, अमरावती शिक्षक आणि पुणे शिक्षक या मतदारसंघांचा समावेश आहे. या पाचही मतदारसंघांच्या नव्या मतदार याद्या तयार करण्याची प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण करण्यात आली आहे. या निवडणुकीत छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदारसंघाचे सतीश चव्हाण, पुणे पदवीधरचे अरुण लाड, नागपूर पदवीधरचे अभिजीत वंजारी, अमरावती शिक्षकचे किरण सरनाईक आणि पुणे शिक्षकचे जयंत आसगावकर यांच्या जागांचा समावेश आहे. गेल्या काही महिन्यांपासून या मतदारसंघांमध्ये विविध राजकीय पक्षांकडून मतदार नोंदणी आणि संघटनात्मक तयारी सुरू होती. शिक्षकांचे वेतन, जुनी पेन्शन योजना, कायम विनाअनुदानित शाळांचे प्रश्न तसेच पदवीधरांच्या रोजगाराचे प्रश्न हे निवडणुकीतील प्रमुख मुद्दे ठरण्याची शक्यता आहे.



### निवडणूक कार्यक्रम असा

मतदान : २३ ऑक्टोबर २०२६ – मतमोजणी व निकाल : २७ ऑक्टोबर २०२६ – मतदारसंघ : पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर पदवीधर, तसेच अमरावती आणि पुणे शिक्षक

## संपादकीय

### दुष्काळ शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न

महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू शेती आहे. शेतकऱ्याच्या शेतात पीक उभे राहिले तर गावातील बाजारपेठेला चालना मिळते, शेतमजुरांच्या हाताला काम मिळते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र गतिमान होते. मात्र पावसाने साथ सोडली की त्याचा परिणाम केवळ एका शेतकऱ्याच्या शेतापुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण गावाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम जाणवू लागतात. त्यामुळे दुष्काळ हा केवळ पाण्याचा प्रश्न नसून शेतकरी, शेतमजूर, पशुधन, रोजगार, बाजारपेठ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे.यंदाच्या हंगामात अनेक भागांत पावसाचे असमान वितरण, पावसातील खंड आणि पिकांच्या गरजेच्या काळात अपेक्षित पाऊस न मिळाल्याने शेतकऱ्यांसमोर पुन्हा संकट उभे राहिले आहे. कुठे पेरणी झाली, पिके उगवली; मात्र पुढील वाढीसाठी आवश्यक ओलावा उपलब्ध झाला नाही. काही ठिकाणी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या नजरा पुन्हा आभाळाकडे लागल्या आहेत. पेरणीपासून मशागतीपर्यंत शेतकऱ्याने केलेला खर्च, घेतलेले कर्ज आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी ठेवलेल्या अपेक्षा या सर्वांचा आधार पिकाच्या उत्पादनावर असतो. मात्र पाऊसच दगा देत असेल तर शेतकऱ्याच्या आर्थिक गणिताचा पाया डळमळतो.

शेतकऱ्याला बियाणे, खत, औषधे, मजुरी, मशागत, डिझेल यासाठी मोठा खर्च करावा लागतो. अनेक वेळा हा खर्च भागविण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. पीक चांगले आले तर कर्ज फेडण्याची आणि पुढील हंगामाची तयारी करण्याची आशा असते. परंतु पावसाअभावी उत्पादन घटले तर उत्पन्न कमी होते आणि कर्जाचा भार वाढतो. त्यामुळे दुष्काळाचे संकट एका हंगामापुरते मर्यादित राहत नाही; त्याचा परिणाम पुढील अनेक हंगामांवर होतो. या परिस्थितीत शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर ठोस आर्थिक आणि प्रशासकीय आधाराची गरज आहे.दुष्काळाचा फटका केवळ पिकांना बसत नाही, तर पशुधनावरही त्याचे गंभीर परिणाम होतात. शेतात चारा उपलब्ध राहत नाही, पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते आणि जनावरे सांभाळणे शेतकऱ्यांसाठी कठीण बनते. पशुधन हा ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार असल्याने जनावरे विकण्याची वेळ शेतकऱ्यावर येऊ नये, यासाठी प्रशासनाने चारा आणि पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर दुष्काळी भागातील भूमिहीन शेतमजूर कुटुंबांचाही गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. शेतीत काम उपलब्ध नसल्याने त्यांच्या हाताला रोजगार राहत नाही आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो.दुष्काळ जाहीर करणे किंवा मदतीच्या घोषणा करणे पुरेसे नाही. शासनाकडून जाहीर होणारी मदत प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. पिकांचे पंचनामे वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने झाले पाहिजेत. पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीकविमा आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळताना अनावश्यक अडथळे येऊ नयेत. दुष्काळग्रस्त भागातील परिस्थितीची गावनिहाय पाहणी करून प्रशासनाने वस्तुस्थितीच्या आधारे निर्णय घेणे गरजेचे आहे. मदतीसाठी शेतकऱ्याला वारंवार कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची वेळ येऊ नये, ही प्रशासनाची जबाबदारी आहे.दुष्काळाच्या काळात रोजगाराचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. शेतीची कामे थांबली की शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांचे उत्पन्न बंद होते. अशा परिस्थितीत रोजगाराच्या माध्यमातून ग्रामीण कुटुंबांना आर्थिक आधार देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि गावातील पाणीपुरवठ्याचे नियोजन याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.मात्र दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ टँकर, चारा किंवा तात्पुरत्या मदतीवर अवलंबून राहून चालणार नाही. पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे, नाला खोलीकरण, बंधारे, शेततळी, जलसंधारणाची कामे, ठिबक आणि तुषार सिंचन यांचा व्यापक वापर करणे आवश्यक आहे. गावागावात उपलब्ध पाण्याचे नियोजन केले तर भविष्यातील संकटाची तीव्रता कमी करता येऊ शकते. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते गावाच्या परिसरातच कसे साठवता येईल, यावर स्थानिक पातळीवर नियोजन झाले पाहिजे.पावसाच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर पीक पद्धतीतही बदल करणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा विचार करून कमी कालावधीची आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके, आंतरपीक पद्धती आणि शेतीपूरक व्यवसाय यांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे. पशुपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन यांसारख्या व्यवसायांना बाजारपेठ, प्रशिक्षण आणि आर्थिक मदतीची जोड मिळाली तर शेतकऱ्याच्या उत्पन्नाला पर्यायी आधार मिळू शकतो.दुष्काळ हा केवळ शेतकऱ्याचा प्रश्न नाही. शेतकऱ्याचे उत्पन्न घटले की ग्रामीण बाजारपेठेतील खरेदी कमी होते. त्याचा परिणाम व्यापारी, दुकानदार, वाहतूकदार, मजूर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील इतर घटकांवर होतो. त्यामुळे दुष्काळाकडे केवळ कृषी विभागाचा विषय म्हणून न पाहता संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचे संकट म्हणून पाहण्याची गरज आहे.दरवर्षी पावसाची अनिश्चितता आणि दुष्काळाची चर्चा होते. मात्र संकट आल्यानंतरच उपाययोजना करण्यापेक्षा पाऊस असतानाच पुढील संकटाचे नियोजन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक गावाने आपल्या पाण्याचा, जमिनीचा आणि उपलब्ध संसाधनांचा विचार करून दीर्घकालीन जलव्यवस्थापन आराखडा तयार केला पाहिजे. शासनाने त्याला आवश्यक आर्थिक, तांत्रिक आणि प्रशासकीय पाठबळ दिले पाहिजे. ग्रामपंचायत, प्रशासन, शेतकरी संघटना आणि ग्रामस्थ यांनी एकत्रितपणे काम केले तर दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी निश्चितच मार्ग निर्माण होऊ शकतो.आज शेतकरी आभाळाकडे पाहत आहे. त्याच्या नजरेत केवळ पावसाची अपेक्षा नाही, तर आपल्या कष्टाला न्याय मिळावा आणि संकटाच्या काळात शासन आपल्या पाठीशी उभे राहावे, ही अपेक्षा आहे. दुष्काळ हा निसर्गाचा प्रश्न असला तरी त्याचा सामना करण्याची तयारी ही शासन आणि समाजाची जबाबदारी आहे. घोषणांपेक्षा प्रत्यक्ष मदत, तात्पुरत्या उपायांपेक्षा कायमस्वरूपी जलव्यवस्थापन आणि आश्वासनांपेक्षा वेळेत निर्णय हीच आजची खरी गरज आहे.शेतकरी वाचला तर शेती वाचेल, शेती वाचली तर ग्रामीण अर्थव्यवस्था वाचेल. त्यामुळे दुष्काळाकडे दुर्लक्ष करण्याची नव्हे, तर शेतकऱ्याच्या पाठीशी ठोसपणे उभे राहून आजच उपाययोजना करण्याची हीच वेळ आहे.

# निंभोरा पोलिसांची धडाकेबाज कारवाई घरफोडीच्या तीन गुन्ह्यांची उकल

## पाच आरोपी अटकेत; तब्बल ६ लाख १६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

दैनिक वादळ वार्ता

**रावेर जळगाव । जितु इंगळे**

निंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या घरफोडीच्या तीन गुन्ह्यांचा छडा लावत पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. अटकेतील आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ६ लाख १६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.निंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील खिर्डी येथे राहणाऱ्या शेहनाज शेख अख्तर या आपल्या कुटुंबीयांसह बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी १३ ते १४ सप्टेंबर २०२६ दरम्यान त्यांच्या घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ६ लाख ३२ हजार ८१० रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी निंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी निंभोरा पोलीस ठाण्याच्या प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख यांना आरोपींचा शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याच्या सूचना दिल्या.त्यानुसार पोलिसांनी गोपनीय माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान एका आरोपीला मुंबई येथून, तर इतर आरोपींना खिर्डी येथून ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये नवाज शेख शरीफ (वय २३), अशपाक ऊर्फ अट्ट्या शेख रमजान (वय ३२), शहादत बेग रफिक बेग (वय २२), चेतन लिलाधर जाधव (वय २९) आणि शाकीब बेग साबीर बेग (वय ३२), सर्व रा. खिर्डी खुर्द, ता. रावेर यांचा समावेश आहे.

तपासादरम्यान नवाज शेख याच्याकडे चौकशी केली असता त्याने साथीदारांच्या मदतीने घरफोडी केल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शहादत बेग याला मुंबई येथून, तर अशपाक ऊर्फ अट्ट्या शेख आणि शाकीब बेग यांना खिर्डी येथून ताब्यात घेतले.

अटकेतील आरोपींकडून पहिल्या घरफोडीतील चोरीस गेलेल्या मालापैकी ५ लाख ७९ हजार ३१० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली. यामध्ये सोन्याची पोत, कानातील झुमके, अंगठ्या तसेच चांदीचे फुलतोडे, गुजऱ्या, बांगड्या व हातातील कड्यांचा समावेश आहे.

आरोपींची अधिक सखोल चौकशी केली असता त्यांनी खिर्डी गावातच आणखी दोन ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या तपासातून चेतन जाधव याचेही नाव निष्पन्न झाले. या दोन्ही गुन्ह्यांमधील चोरीस गेलेल्या एकूण १ लाख ७७ हजार ४०० रुपयांच्या मुद्देमालापैकी ३७ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली. यामध्ये सोन्याच्या बाळ्या तसेच चांदीच्या लक्ष्मी, शारदा, बालगोपाळ आणि गणेशाच्या मूर्तींचा समावेश आहे.

अशाप्रकारे निंभोरा पोलिसांनी तीन घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करून एकूण ६ लाख १६ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अटकेतील आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक ए. एम. ढाकणे, ममता आर. तडवी तसेच पोहेकॉ रिजवान पिंजारी, पोहेकॉ अविनाश पाटील, पोलीस कॉन्स्टेबल सुआष शिंदे, परेश सोनवणे, किरण जाधव, सर्फराज तडवी व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# श्रीगणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापौर श्रीमती रितू तावडे यांच्याकडून घाटकोपर मेट्रो स्थानकाची पाहणी

## प्रवाशांशी थेट संवाद साधून नागरी सुविधांचा घेतला सविस्तर आढावा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

श्रीगणेशोत्सवाच्या काळात मुंबईत नियमित प्रवाशांसोबतच भाविक आणि पर्यटकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन, मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे यांनी घाटकोपर मेट्रो स्थानकाला आज (दिनांक २२ सप्टेंबर २०२६) प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. सण आणि उत्सव काळात मुंबईकरांचा आणि मुंबईत येणाऱ्या पाहुण्यांचा प्रवास सुकर, सुरक्षित व गतिमान व्हावा या उद्देशाने महापौरांनी मेट्रो स्थानकावरील संपूर्ण सुविधा आणि व्यवस्थेची बारकाईने पाहणी केली आणि प्रवाशांशी थेट संवाद साधला.



या पाहणी दौऱ्यादरम्यान महापौर श्रीमती रितू तावडे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने घाटकोपर मेट्रो स्थानक परिसरात पुरवल्या जाणाऱ्या विविध नागरी सेवा-सुविधा, स्वच्छता, आरोग्य व्यवस्था आणि आपत्कालीन रुग्णवाहिका सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेतला.

यासोबतच, मेट्रो प्रशासनाच्या वतीने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या दैनंदिन सुविधा आणि एकूणच मेट्रो प्रवासाच्या अनुभवाविषयी महापौरांनी प्रवाशांशी आस्थेने चर्चा केली. प्रवाशांनी मांडलेली मते, सूचना आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, नागरिकांच्या प्रवासाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी प्रशासनाने तत्काळ सकारात्मक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना महापौरांनी दिल्या.त्याचप्रमाणे, महापौरांनी मेट्रोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विविध तांत्रिक व व्यवस्थापकीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने श्रीगणेशोत्सवादरम्यान आणि एरवी गर्दीच्या (पीक अवर्स) वेळेत केले जाणारे गर्दी नियंत्रण, मेट्रोचे संचालन आणि नियोजन, दैनंदिन प्रवासी संख्या, तिकिटांचे सध्याचे दर, तसेच प्रवाशांच्या वाढत्या गर्दीला सामावून घेण्यासाठी भविष्यात मेट्रो कोचेसची संख्या वाढविण्याची योजना याबाबत महापौरांनी मेट्रो प्रशासनाकडून माहिती जाणून घेतली. मेट्रोच्या महसूल उत्पन्नाचे विविध मार्ग आणि त्यामध्ये शाश्वत वाढ करण्यासाठी मेट्रो प्रशासनाने केलेले नियोजन या विषयांवरही महापौरांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.मेट्रो प्रशासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासन यांच्यामध्ये अधिक समन्वय साधण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य पुरवले जाईल, असे महापौरांनी यावेळी मेट्रो प्रशासनाला आश्वस्त केले.या पाहणीप्रसंगी मेट्रोचे व्यवसाय प्रमुख श्री. अजय कुमार, उपमहाव्यवस्थापक श्री. मयंक रावत, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. अल्पेश नागदा यांच्यासह मेट्रोचे संबंधित तांत्रिक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एन' विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. जयदीप मोरे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र हांगे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सेझच्या जमिनी सरकारजमा होणार नाहीत शेतकऱ्यांनाच परत मिळणार–हेमंत म्हात्रे

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (सेझ) संपादित करण्यात आलेल्या, मात्र निर्धारित कालावधीत वापरात न आणलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळण्याचा मार्ग मोकळा होत असल्याचा दावा सेझग्रस्त शेतकरी संघटना उरण, पेण व पनवेलचे अध्यक्ष हेमंत म्हात्रे यांनी केला आहे. या जमिनी सरकारजमा न होता नियमानुसार संबंधित शेतकऱ्यांनाच परत मिळतील, असे त्यांनी सांगितले.म्हात्रे यांनी सांगितले की, मागील सहा वर्षांपासून संघटनेच्या माध्यमातून या प्रश्नाचा पाठपुरावा सुरू आहे. कुळकायदा कलम ६३ (१अ) अन्वये मे. महामुंबई एस.ई.झेड. लि.साठी संपादित करण्यात आलेल्या जमिनी कंपनीने १५ वर्षांच्या कालावधीत वापरल्या नसल्याने सुमारे १२०० शेतकऱ्यांनी ड. दत्तात्रेय नवाळे यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे जमिनी परत मिळण्यासाठी चौकशी अर्ज दाखल केले आहेत. या प्रकरणाची अंतिम सुनावणी पूर्ण झाली असून निकालाची प्रतीक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान, पेण तालुक्याचे आमदार रवी पाटील यांनी सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या



प्रश्नावर महसूल मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात दोन बैठका आयोजित केल्या होत्या. या बैठकीत १५ वर्षे जमीन वापरात न आणल्याच्या प्रकरणांमध्ये नियमानुसार जमिनी परत देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी २९ जुलै २०२६ रोजी महसूल व वन विभागाला पाठविलेल्या अहवालात, संपादित जमिनींच्या बदल्यात पुनर्वसनाचे लाभ शेतकऱ्यांना देण्यात आले नसल्याने संबंधित जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केल्याचा दावा करण्यात आला आहे.उरण, पेण व पनवेल तालुक्यातील सेझसाठी संपादित झालेल्या जमिनींबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल शेतकऱ्यांच्या भूमिकेला बळ देणारा असल्याचे सेझग्रस्त शेतकरी संघटनेचे कायदेविषयक सल्लागार ड. दत्तात्रेय नवाळे यांनी सांगितले.दरम्यान, या प्रश्नावर संघटनेने दीर्घकाळ पाठपुरावा केल्यानंतर आता काही राजकीय मंडळी श्रेय घेण्यासाठी बैठका व मोर्चे काढत असल्याचा आरोप हेमंत म्हात्रे यांनी केला. सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना नियमानुसार परत मिळाव्यात, हीच आमची प्रमुख मागणी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# दिव्यात नगरसेविका साक्षी मढवी यांचा Gen Z-Gen Alpha सोबत 'मोकळा संवाद'

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २८ च्या नगरसेविका कु. साक्षी रमाकांत मढवी यांच्या पुढाकाराने दिवा येथील डचत्र्ञ इंग्लिश हायस्कुल मध्ये इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसोबत Gen Z-Gen Alpha 'मोकळा संवाद' हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात खुली चर्चा, वन-टू-वन संवाद आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या समस्या, करिअर विषयक आकांक्षा आणि युवा लोकप्रतिनिधींकडून असलेल्या अपेक्षा थेट जाणून घेण्यात आल्या.सदर संवादा दरम्यान विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी दिव्यातील नागरी प्रश्नांकडे लक्ष वेधले. यामध्ये वाहतूक कोंडी, रस्त्यावरील फेरीवाले, पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था, रस्त्यांवरील खड्डे आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. विशेषतः निळजे गाव येथील जलवाहिनी गळतीमुळे गेल्या १५ ते १८ दिवसांपासून पाणीपुरवठ्यावर झालेला परिणाम, ड्रेनेज तुंबून निर्माण होणारी दुर्गंधी, तसेच काही इमारतींच्या ड्रेनेज जोडण्यांमुळे व्यवस्थेवर पडणारा ताण या मुद्द्यांवर गांभीर्याने विचारविनिमय करण्यात आला. कचरा व्यवस्थापनाबाबत महानगरपालिकेकडून प्रयत्न सुरू असले तरी नागरिकांनीही योग्य पद्धतीने कचरा टाकून आपली सवय सुधारणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. नागरी समस्यां व्यतिरिक्त, विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्याचा विचार करत शहरात करिअर मार्गदर्शन सत्रे, रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करणे आणि विशेष 'जॉब फेअर' (रोजगार मेळावे) आयोजित करण्याची मागणी नगरसेविकेकडे केली.

# तळोद्यात घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या; पावणेदोन लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; रोझवा पुनर्वसन येथील तिघे जेरबंद

दैनिक वादळ वार्ता
**दिपक गोसावी । नंदुरबार**

तळोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घरफोडीच्या गंभीर गुन्ह्याची स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत उकल केली आहे. पोलिसांनी कारवाई करत तब्बल १ लाख ८९ हजार रुपये किमतीचा सोन्या-चांदीचा ऐवज आणि रोकड हस्तगत केली असून, याप्रकरणी तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. या धडक कारवाईमुळे परिसरातील घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी नुकतीच मासिक गुन्हे आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत मालमत्तेविरुद्धच्या दाखल गुन्ह्यांमधील अज्ञात आरोपींचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्याचे, तसेच चोरीस गेलेला मुद्देमाल लवकरात लवकर हस्तगत करण्याचे सक्त निर्देश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिले होते.याच पार्श्वभूमीवर तळोदा पोलीस ठाणे अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्ह्यांचा स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू होता. यादरम्यान, दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदाराकडून अत्यंत खात्रीशीर माहिती मिळाली की, ३ ते ४ दिवसांपूर्वी तळोदा हद्दीतील आंबागव्हाण फाट्या परिसरात झालेली घरफोडी ही रोझवा पुनर्वसन येथील रायमल वसावे आणि विरसा वसावे यांनी त्यांच्या इतर साथीदारांच्या मदतीने केली आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी तत्काळ पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रोझवा पुनर्वसन गावात धडक देऊन परिसराची पाहणी केली आणि संशयावरून तिघांना ताब्यात घेतले.




ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांमध्ये
विरसिंग रमेश वसावे (वय २२, रोझवा पुनर्वसन नंबर ४, तालुका तळोदा).
भूषण मोज्या पावरा (वय २३, रोझवा पुनर्वसन नंबर ४, तालुका तळोदा)
किसन कोंदा पावरा (वय ५५, रोझवा पुनर्वसन नंबर ३, तालुका तळोदा) यांचा समावेश होता.

या संशयितांची कसून चौकशी केली असता, त्यांनी आपल्या इतर दोन साथीदारांच्या मदतीने सदर चोरीची कबुली दिली.

संशयितांकडून पोलिसांनी गुन्ह्यात चोरीस गेलेला ऐवज जप्त केला आहे. यामध्ये ९२,००० रुपये किमतीचे ४६० ग्रॅम चांदीचे दागिने, ८७,८७८ रुपये किमतीचे ७ पूर्णांक ९०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि १०,००० रुपये रोख असा एकूण १,८९,८७८/- रुपये किमतीचा मुद्देमाल यशस्वीरित्या हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची उत्कृष्ट कामगिरी पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक अशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक महेश निकम, पोलीस हवालदार दादाभाऊ वाघ, ज्ञानेश्वर पाटील, सचिन वसावे, मोहन ढमढेरे, तसेच पोलीस अंमलदार राहुल पांढारकर, विशाल मराठे आणि सचिन सैंदाणे यांच्या पथकाने पार पाडली आहे. या कामगिरीमुळे नागरिकांमधून पोलिसांचे कौतुक होत आहे.

# माजलगाव बाजार समिती शेतक-यांच्या जिव्हाळ्याची संस्था-रमेश घुले

## माजलगाव बाजार समिती आवारामध्ये शेतक-यांची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । विजय डावरे**

राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे चे संचालक मिलिदजी अकरे साहेब यांच्या सूचनेवरून व उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बाजार समितीच्या फुलेपिंपळगाव बाजार आवारात दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते ५.०० या वेळेत एक दिवसीय शेतकरी कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.




यावेळी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे संस्थेचे बाजार समिती विभाग व्यवस्थापक रमेश घुले, कृषी विज्ञान प्रमुख हनुमान गरूड, डॉ. तुकेश सुरफान, डॉ. भैय्यासाहेब गायकवाड, प्रशासन विभागाचे राजेश नाफडे, मार्केटींग व्यवस्थापक संतोष डोईफोडे, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, संचालक प्रभाकर होके, संजय कचरे, सचिव हरिभाउ सवणे, सहाय्यक सचिव रविंद्र नाईकनवरे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना संस्थेचे बाजार समिती विभागाचे व्यवस्थापक रमेश घुले म्हणाले की, शेतक-यांनी माती व पाणीपरिक्षण करणे गरजेचे असुन बाजार समिती टिकविण्यासाठी शेतक-यांनी आपला शेतीमाल बाजार समितीच्या आवारातच विक्री करावा. बाजार समिती शेतक-यांच्या जिव्हाळ्याची संस्था असल्याचे त्यांनी सांगीतले. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख हनुमान गरूड यांनी उत्पादन खर्च कमी करायचा आणि उत्पन्न दुप्पट झाले पाहिजे. जमिनीचा सेंद्रीय कर्ब प्रमाण किती याची तपासणी करावी आणि अतिरिक्त पाणी देणे देखिल टाळावे. विषय विशेष तज्ञ डॉ. तुकेश सुरफान यांनी शेतक-यांनी शेतीतील खर्च कमी करण्यासाठी गटशेतीकडे वळावे आणि शासनाच्या विवीध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. किटकनाशक तज्ञ डॉ. भैय्यासाहेब गायकवाड यांनी दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क, जिवामृत आणि बायोमिक्स सारख्या जैविक निवीष्ठांचा वापर करावा असे आवाहन केले. आभार प्रदर्शनात उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी उपस्थित शेतक-यांना नैसर्गिक शेतीकडे वळा आणि संस्थेने प्रत्येक तिन महिण्याला बाजार समितीमध्ये ही कार्यशाळा घ्यावी असे आवाहन केले. सुत्रसंचालन कनिष्ठ लिपीक सिध्देश्वर येवले यांनी केले. यावेळी कार्यशाळेला उपस्थित शेतक-यांकरीता स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती होती. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी बाजार समितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# नाखलगांव शालेय व्यवस्थापन समिती निवड जाहीर

## अध्यक्षपदी इजास शेख, उपाध्यक्षपदी समाधान गायकवाड व अशोक अतकरे



दैनिक वादळ वार्ता
**दिंद्रुड । प्रतिनिधी**

नाकलगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीची निवड उत्साहपूर्ण वातावरणात सर्वानुमते पार पडली. अध्यक्षपदी इजास शेख, तर उपाध्यक्षपदी समाधान गायकवाड व अशोक अतकरे यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी बळीराम जाधव, सोनाली सारंग पोटभरे, रुबीना रशिद पठाण, निर्मला सुरेश गायकवाड, रेखा दत्ता गवळी, आकाश राधाकिशन पाटोळे, सपना कृष्णा जाधव, नागनाथ किसन शेळके व सविता अतुल रत्नपारखे यांची निवड झाली.केंद्रप्रमुख नाईकवाडे सर, मुख्याध्यापक कुलकर्णी सर व सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी पालक, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहापुरकर सर यांनी केले, तर आभारप्रदर्शन जोगदंड सर यांनी केले.

# नांदूर घाट येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे माध्यमिक विद्यालया च्या विद्यार्थिनींचे क्रीडा स्पर्धेत यश ; जिल्हा स्तरासाठी निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यामध्ये आयोजित शालेय क्रीडा उत्सव २०२६- २७ मध्ये नांदूर घाट येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे माध्यमिक विद्यालय नांदूर घाट च्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे.या उज्ज्वल यशाबद्दल शाळा आणि पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.शाळेतील विद्यार्थिनी वैष्णवी महादेव हांगे हिने १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत चार राऊंड पूर्ण करत पहिला क्रमांक पटकावला.तसेच ३ किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेतही तिने पहिला क्रमांक मिळवला असून तिच्या या उत्कृष्ट कामगिरी मुळे तिची जिल्हा स्तरीय खेळासाठी पुढील टप्प्यात निवड झाली आहे.तसेच १४ वर्षे वयोगटामध्ये शाळेतील संध्या संदीप घुगे हिने गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि थाळीफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून आपल्या शाळेच्या नावाचा गौरव वाढवला आहे.या दोघीं च्या यशाबद्दल क्रीडा ग्राउंडवर तालुका क्रीडा अधिकारी यादव मॅडम,शाळेचे शिक्षक तसेच परिसरातील नातेवाईक यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच शाळा परिवार आणि नातेवाईकांकडून दोन्ही विद्यार्थिनींना पुढील क्रीडा वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



# मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूल केज येथे स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी. एक्स मार्फत लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूल केज येथे एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम नर्सिंगच्या विद्यार्थ्यां साठी घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.रवी पवार सर मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून (सेबी) तसेच एम.सी. एक्सचे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स,कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरा वर सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट, कमोडिटी व इक्विटी मध्ये असेल असलेला फरक,डिमॅट अकाउंट, तसेच सेबीच्या सारथी प चे महत्त्व विषद करत मार्गदर्शन केले. तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व स्टाफने विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले तर सूत्र संचालन प्राध्यापक अश्विन लखेरा सर यांनी केले या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सामाजिक कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल सुनिल गायकवाड गोजेगावकर यांना दुहेरी पुरस्कार

दैनिक वादळ वार्ता
**मुदखेड । प्रतिनिधी**

मुखेड तालुक्यातील गोजेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सुनिल गायकवाड गोजेगावकर यांच्या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय व सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत त्यांना 'राष्ट्रीय समता गौरव पुरस्कार-२०२६' तसेच 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे समाज परिवर्तन गौरव पुरस्कार-२०२६' या दोन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. मातोश्री लक्ष्मीबाई ठाकूर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड आणि मायडी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते गायकवाड यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत वंचित व गरजू घटकांसाठी केलेले कार्य, सामाजिक प्रश्नांबाबत जनजागृती आणि समाजपरिवर्तनासाठी दिलेले योगदान याची दखल घेत हा गौरव करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

या सोहळ्यास शंकरसिंह ठाकूर, मारोती शिकारे, सय्यद मुजीबभाई यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुनिल गायकवाड गोजेगावकर यांना मिळालेल्या या दुहेरी सन्मानामुळे गोजेगाव व मुखेड परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या कार्याचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



# तळोद्यात गणेश विसर्जन मिरवणुकीतील आक्षेपार्ह सादरीकरणावरून वाद

## ‘सकल हिंदू समाजा’चा तीव्र निषेध, कठोर कारवाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**दिपक गोसावी । नंदुरबार**

शहरात गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान एका शाळेच्या चित्ररथावर थडग्याची प्रतिकृती उभी करून प्रार्थना आणि गाण्यावर नृत्य करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे हिंदू धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करत ‘सकल हिंदू समाज, तळोदा’च्या वतीने तहसीलदार कार्यालयात अधिकृत निवेदन देत तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तळोदा येथील नेमसुशील विद्यालयाच्या वतीने गणेश विसर्जन मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीला ‘शिवराज्याभिषेक’ असे नाव देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष सादरीकरणात शिवराज्याभिषेकाच्या ऐतिहासिक प्रसंगाशी सुसंगत नसलेले घटक समाविष्ट करण्यात आले. मिरवणुकीत थडग्याची प्रतिकृती उभी करून त्यासमोर प्रार्थना करण्याचा प्रसंग दाखविण्यात आला, तसेच एका विशिष्ट गाण्यावर गणेशमूर्तीसमोर नृत्य करण्यात आले. या सादरीकरणामुळे नागरिकांमध्ये ऐतिहासिक गैरसमज व संभ्रम निर्माण होत असून धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आक्षेप निवेदनात नोंदवण्यात आला आहे.

सकल हिंदू समाज तळोदा च्या वतीने मागण्या करण्यात आल्या आहेत की, घटनेची तात्काळ चौकशी करून यामागील नेमका उद्देश स्पष्ट करण्यात यावा.संबंधित शाळा व्यवस्थापन, आयोजक




आणि जबाबदार व्यक्तींची भूमिका तपासून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी.धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी शाळा व्यवस्थापनाकडून जाहीर स्पष्टीकरण मागवावे. मिरवणुकीचे व्हिडिओ, फोटो व इतर तांत्रिक पुरावे तपासून वस्तुस्थिती निश्चित करावी. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने कठोर नियमावली व निर्देश लागू करावेत.सकल हिंदू समाजातर्फे देण्यात आलेल्या या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत प्रशासनाने योग्य ती कारवाई करून अहवाल जाहीर करावा. जर ठरवून दिलेल्या मुदतीत कारवाई झाली नाही, तर सनदशीर मार्गाने व लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.या निवेदनावर दीपक चौधरी, रोहित सूर्यवंशी,अजय ठाकरे, रोहित शिंपी, अतूल अहिरे, मुकेश कोळी , भूषण मराठे, चैतन्य आर्य , मुकेश बिरारे,शिरीष मगरे, आकाश सूर्यवंशी, दुर्गेश कर्णवार, महेश परदेशी , राजेंद्र मोरे, धनंजय बारगळ, विजय सोनवणे, रमेश चौधरी, जिग्नेश मराठे, पवनकुमार शेलकर ,महेंद्र गुरव, रोहित पाडवी यांच्या स्वाक्षऱ्या असून निवेदन देतेवेळी यांच्यासह तळोद्यातील बहुसंख्य नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोलगी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत जागतिक ओझोन दिन साजरा

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी । मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळ नंदुरबार संचलित अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा मोलगी येथे १६ सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी विज्ञान मंडळाच्या वतीने पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन माध्यमिक मुख्याध्यापक राहुल पाटील आणि प्राथमिक मुख्याध्यापिका ज्योती तडवी यांनी केले.

विज्ञान मंडळ प्रमुख राजश्री चौधरी यांनी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना ओझोन दिनाचे महत्त्व मांडताना सूर्याच्या अतिनील किरणांपासून पृथ्वीवरील जीवसृष्टीचे संरक्षण करणाऱ्या ओझोन थराचे महत्त्व लोकांना समजावे म्हणून ओझोन दिवस साजरा केला जातो.

ओझोन थराचे होणारे नुकसान आणि त्याचे पर्यावरणावर होणारे परिणाम याबाबत जनजागृती करण्यासाठी.




ओझोन थराला हानी पोहोचवणाऱ्या CFC सारख्या रसायनांचा वापर मानवाने कमी करायला हवा. पर्यावरण संरक्षण आणि पृथ्वीचे आरोग्य टिकवण्यासाठी लोकांना सहभागी करून समाजात जनजागृती करायला हवी. यासाठी १६ सप्टेंबर १९८७ रोजी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षऱ्या झाल्या, म्हणून हा दिवस ओझोन थराच्या संरक्षणासाठी समर्पित करण्यात आला असे मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी ओझोन वायूमुळे होणारे फायदे आणि तोटे, तसेच ओझोन वायूमुळे मानवी जीवनावर होणारे परिणाम यावर आधारित सुंदर पोस्टर तयार केले आणि आश्रम शाळेतील इयत्ता पहिली ते दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांना प्रदर्शनात सहभागी केले. यावेळी या पोस्टर प्रदर्शनाचे परीक्षण विलास मराठे आणि उदय गावित यांनी केले. यात इयत्ता पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी असे दोन गट तयार करून या सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन प्राथमिक मुख्याध्यापिका ज्योती तडवी माध्यमिक मुख्याध्यापक राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान शिक्षिका राजश्री चौधरी, विलास मराठे, सचिन नाथजोगी, दीपिका गावित, उदय गावित, निशा वळवी, सुरेश गावित, प्रशांत खैरनार, संदीप पवार,

# आ.डॉ.गुट्टे यांच्या पाठपुराव्याला यश,वैद्यकीय उपचारा साठी मुख्यमंत्री सहायता निधीतून दोन लाखाची मदत मंजूर


## आ.डॉ.गुट्टे यांचे कार्यालयीन आरोग्य दूत प्रभाकर सातपुते यांनी अर्ज दाखल केला

दैनिक वादळ वार्ता

**गंगाखेड । गोपाळकृष्ण पाळवदे**

पेंडू(खु.) येथील सूर्यकांत रावसाहेब केजगीर यांच्या वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून २ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर झाले असून, या मदतीमुळे त्यांच्या उपचाराचा आर्थिक भार काही प्रमाणात हलका होणार आहे. त्यामुळे या मदतीबद्दल केजगीर कुटुंबीयांकडून समाधान व्यक्त केले.

सूर्यकांत केजगीर यांच्या वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मिळावी, यासाठी स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांचे कार्यालयीन आरोग्यदूत प्रभाकर सातपुते यांच्यामार्फत करण्यात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई यांच्या वतीने १० सप्टेंबर २०२६ रोजी अधिकृत पत्र जारी करण्यात आले आहे. या पत्रानुसार संबंधित वैद्यकीय उपचाराचा खर्च भागविण्यासाठी २


क्रमांक : 003176202627M/CMRF/MR/4381/202627
मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष
मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
दुरध्वनी :- 022-22026948
10/09/2026

प्रति,
डॉ राजीव रेवाजी राठोड
स्टार किडनी सेंटर सुपरस्पेशालिटी अँड आय सी यु, नांदेड,
प्लॉट क्रमांक एकशे अठ्ठावीस, गोवर्धन घाट रोडजवळ, , बोरबन फॅक्टरी परिसर, वजिराबाद, नांदेड

विषय :-वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्याबाबत.
संदर्भ :- Surykant Ravsaheb Kejgir यांच्याकरिता केलेला अर्ज.

मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भाधिन अर्जास अनुसरुन Surykant Ravsaheb Kejgir यांच्या Renal Transplant या आजारावरील उपचाराचा खर्च भागविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून रु. 200000.0 (रुपये दोन लाख ) चे अर्थसहाय्य मंजूर केले आहे. सदरहू रक्कम आपल्या रुग्णालयाच्या खाते क्रमांक 50200064579781 मध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया , मुंबई मुख्य शाखा या बँकेमार्फत यु.टी.आर. क्रमांक -SBIN426252392282,दिनांक. 09-09-2026 अन्वये वर्ग करण्यात आली आहे.

2. सदर अर्थसहाय्य मुख्यमंत्री सचिवालय, शासन परिपत्रक क्रमांक:-मुमंसनि-2025/प्र.क्र.01/निधी कक्ष, दिनांक 22.01.2025 मधील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत असून, रुग्णालयाने सदर अटींच्या अधीन राहून अर्थसहाय्य खर्च करावे. तसेच रुग्णासाठी देण्यात आलेले अर्थसहाय्य 90 दिवसांत उपयोगात आणावे अन्यथा शिल्लक राहिल्यास 90 दिवसांत खालील बँक खात्यात वर्ग करण्यात यावे.

* खातेदाराचे नाव - Chief Ministers Relief Fund
* बँकेचे नांव व शाखा(कोड) - State Bank of India, Main Branch, Fort(00300)
* बँक खाते क्रमांक व आय एफ एस सी - 10972433751, SBIN0000300

3. उपरोक्त संदर्भात काही शंका असल्यास aaouti.cmrf-mh@nic.in या ई-मेलवर किंवा 022-22026948 या फोन नंबरवर त्वरीत संपर्क साधावा.

RAMESHWAR PUNAMCHAND NAIK DANGARE
(रामेश्वर नाईक)
कक्ष प्रमुख,
मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

प्रत :
Surykant Ravsaheb Kejgir
पालम, परभणी 431720
मा. आमदार रत्नाकर माणिकराव गुट्टे
Gangakhed

लाख रूपये इतके अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. संबंधित रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखेमार्फत रुग्णालयाच्या खात्यावर वर्ग करण्यात आल्याचेही मंजुरी पत्रात नमूद आहे.मुख्यमंत्री सहायता निधीसारख्या शासकीय यंत्रणेतून मिळणारी मदत ही गरजू रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण आधार ठरते, असे आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून सांगितले. दरम्यान, लोकप्रतिनिधित्वाची खरी भूमिका ही आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या वैयक्तिक आणि सामाजिक अडचणींच्या वेळी शासनाच्या योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यातही आहे. त्यामुळे वैद्यकीय संकटाच्या काळात गरजू कुटुंबाला शासकीय मदतीचा हात मिळवून देणे, ही सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने महत्त्वाची बाब असते. शिवाय, मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर झालेल्या अर्थसहाय्याचा संबंधित रुग्णालयाने शासनाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उपयोग करणे अपेक्षित असून, मंजूर अर्थसहाय्य ९० दिवसांच्या आत उपयोगात आणणे आवश्यक असल्याचेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले.

# आर्थिक साक्षरतेसाठी आकाशवाणीवर ॲड .रविंद्र कानडे यांची विशेष मुलाखत

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । विजय डावरे**

आर्थिक साक्षरतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रातर्फे 'आर्थिक साक्षरता' या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. माजलगाव जिल्हा बीड येथील श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.चे व्यवस्थापकीय संचालक ड. रविंद्र कानडे यांची या विषयावर विशेष मुलाखत घेण्यात आली आहे.ॲड रवींद्र कानडे फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट चे संचालक असून आर्थिक व्यवस्थापन या विषयाचे तज्ञ आहेत व व्यवस्थापनाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना आहे. या मुलाखतीत बचत, गुंतवणूक, आर्थिक नियोजन, कर्जाचा जबाबदारीने वापर आणि आर्थिक स्वावलंबन याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. विशेषतः सर्वसामान्य नागरिक, महिला, तरुण, शेतकरी व छोटे व्यावसायिक यांनी आर्थिक



निर्णय घेताना योग्य माहिती घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.


हा विशेष कार्यक्रम दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.१० वाजता आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर, ऋ्र् १०१.७ चकूवर प्रसारित होणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन राज दळेकर, तर सादरीकरण सुजित बनसोडे यांनी केले.'आर्थिक साक्षर नागरिक - सक्षम कुटुंब - समृद्ध समाज' हा संदेश या कार्यक्रमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

# थायलंडच्या अष्टधातू बुद्धमूर्तीने सजणार कन्हेरवाडीचे बुद्ध विहार; २७ सप्टेंबरला सोहळा

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथील सम्राट अशोक बुद्ध विहारात थायलंडहून आणण्यात आलेल्या साडेतीन फूट उंचीच्या आणि सुमारे पंचवीस किलो वजनाच्या अष्टधातू बुद्धमूर्तीची रविवार, २७ सप्टेंबर रोजी भव्य प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असून, प्रतिष्ठापनेपूर्वी मंगल वाद्यांच्या गजरात बुद्धमूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.आयु. लक्ष्मणराव रोडे दादा यांच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मणराव रोडे गुरुजी प्रतिष्ठान व समस्त रोडे परिवाराच्या वतीने या बुद्धरूप दान व प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. थायलंडहून थेट कन्हेरवाडीत आणण्यात आलेली देखणी अष्टधातू बुद्धमूर्ती या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. मिरवणुकीनंतर भिक्खू संघाच्या उपस्थितीत बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात



येणार आहे.या मंगल प्रसंगी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्यकारी अध्यक्ष पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो (पूर्णा), ‘दि ग्रेट हॅपीनेस’ युट्यूब चॅनेलचे संचालक पूज्य भदंत करुणानंद महाथेरो (छत्रपती संभाजीनगर), पूज्य भदंत पय्यातीस्स महाथेरो (सिरसाळा) तसेच प्रियदर्शी धम्म संस्कार संस्थेचे सचिव पूज्य भदंत धम्मशील थेरो (बीड) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी पूज्य भिक्खू संघ उपस्थितांना धम्मदेसना देणार आहेत. दिवसभर चालणाऱ्या या धम्मसोहळ्याची सुरुवात सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत भोजनाने होईल. त्यानंतर दुपारी २ वाजता भिक्खू संघाची धम्मदेसना होणार असून, सायंकाळी ५ वाजता बुद्धरूप दान व प्रतिष्ठापना सोहळा संपन्न होणार आहे.या मंगल व ऐतिहासिक धम्मसोहळ्यास परिसरातील उपासक-उपासिका, बौद्ध अनुयायी तसेच धम्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त रोडे परिवार आणि लक्ष्मणराव रोडे गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# केज येथे तालुका स्तरीय शालेय क्रीडा व मैदानी स्पर्धा उत्साहात संपन्न ; मुलांनी दाखवले क्रीडा कौशल्य आणि उत्साह

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,बीड यांच्या संयुक्त विद्यमाने केज तालुकास्तरीय शालेय क्रीडा मैदानी चाचणी व स्पर्धांचे आयोजन दि.२२ सप्टेंबर मंगळवार रोजी उत्साहात करण्यात आले.या स्पर्धेत केज तालुक्यातील विविध शाळांमधील मुलांनी मोठा सहभाग नोंदवला.या क्रीडा महोत्सवात १०० मीटर धावणे,४०० मीटर धावणे,गोळाफेक,लांब उडी आणि भालाफेक अशा विविध मैदानी प्रकारांचा समावेश होता.सकाळी मैदानात पार पडलेल्या उद्घाटना नंतर विविध वयोगटा तील मुलांच्या स्पर्धांना सुरुवात झाली.स्पर्धे दरम्यान मुलांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.१०० मीटर आणि ४०० मीटर धावण्याच्या शर्यती मध्ये खेळाडूंमध्ये चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. तसेच लांब उडी, गोळाफेक आणि भालाफेक प्रकारात विद्यार्थ्यांनी आपली उत्तम कौशल्ये आणि शारीरिक ताकद सिद्ध केली.या प्रसंगी केज तालुक्यातील विविध शाळांचे क्रीडा शिक्षक, मार्गदर्शक,पंच व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी आयोजक आणि पंचांनी विशेष परिश्रम घेतले.सर्व विजेत्या खेळाडूंचे उपस्थित मान्यवरांकडून कौतुक करण्यात आले असून त्यांची पुढील टप्प्या तील (जिल्हास्तरीय) स्पर्धांसाठी निवड करण्यात आली आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077